# प्रेसनोट

दि.२१/०६/२०२२

| | |
|---|---|
| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग/घटक | नाशिक/अहमदनगर |
| गुन्हा नोंद क्रमांक | जामखेड पो.स्टे., जि.अहमदनगर गु.र.नं.२७४/२०२२ |
| कलम | भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम सन १९८८ चे कलम १३(१)(क)(ड), १३(२) सह भा.दं.वि.क.४६८, ४७१, १२०(ब), ३४ |
| आरोपीचे नांव व कार्यालय | १)रमेश गोविंद गोलेकर, वय–६३ वर्ष, तत्कालीन सहायक वन संरक्षक, वर्ग–१, सध्या सेवानिवृत्त रा.खर्डा, ता.जामखेड, जि.अहमदनगर<br>२)संतोष आनंदा बोराडे, वय–६२ वर्ष, तत्कालीन वन परिक्षेत्र अधिकारी, वर्ग–२, जामखेड, सध्या सेवानिवृत्त रा.नंदनवन कॉलनी, भावसिंगपूरा, औरंगाबाद<br>३)महादेव भिमा राठोड, वय–५५ वर्ष, तत्कालीन वनपाल, वर्ग–३, जामखेड सध्या नेमणुक सामाजिक वनीकरण विभाग, शेवगांव |
| शासकीय योजनेत अपहार केलेली रक्कम | रुपये ४०,७१७/– |
| शोडक्यात माहिती | प्रस्तुत बातमीतील हकीगत अशी की, महाराष्ट्र शासनाकडून सन २०१५–१६ मध्ये जलयुक्त शिवार अभियान अंतर्गत मौजे अरणगांव, ता.जामखेड येथील गट नं.२९४ मध्ये खोल सलग समतल चर खोदण्याचे काम दि.१५/१२/२०१४ ते ३१/०३/२०१५ या कालावधीत करण्यात आले होते. सदर झालेल्या कामाची उघड चौकशी करणेबाबत आदेश झाले होते. त्याप्रमाणे मा.महासंचालक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, म.रा., मुंबई व मा.पोलीस अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नाशिक परिक्षेत्र, नाशिक यांचे आदेशानुसार उपरोक्त कामाची उघड चौकशी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, अहमदनगर घटकामार्फत दि.४/९/२०२१ पासुन सुरु करण्यात आली.<br>सदर कामाच्या सखोल चौकशी अंती आरोपी नं.१)रमेश गोविंद गोलेकर, वय–६३ वर्ष, तत्कालीन सहायक वन संरक्षक, वर्ग–१, सध्या सेवानिवृत्त २)संतोष आनंदा बोराडे, वय–६२ वर्ष, तत्कालीन वन परिक्षेत्र अधिकारी, वर्ग–२, जामखेड, सध्या सेवानिवृत्त ३)महादेव भिमा राठोड, वय–५५ वर्ष, तत्कालीन वनपाल, वर्ग–३, जामखेड सध्या नेमणुक सामाजिक वनीकरण विभाग, शेवगांव यांनी मौजे अरणगांव, ता. जामखेड येथील गट नं.२९४ मधील खोल सलग समतल चर खोदण्याचे काम हे मजुरांमार्फत करत असतांना त्यांनी संगनमताने फौजदारीपात्र कट रचुन प्रत्यक्ष कामावर १२.२८ लक्ष रुपये खर्च झालेला असतांना बनावट कागदपत्रे तयार करुन शासनास १२.५९ लक्ष रुपये खर्चाची माहिती सादर करुन रुपये ४०,७१७/– इतक्या रकमेचा भ्रष्टाचार केलेला आहे. तसेच शासन निर्णया मध्ये नमूद केलेल्या सुचना नुसार काम न करता कामात अनियमितता केलेली असले बाबतचा अहवाल वरिष्ठ कार्यालयास सादर करण्यात आला. सदर अहवालावरुन वरिष्ठांचे आदेशान्वये आरोपी नं.१)रमेश गोविंद गोलेकर २)संतोष आनंदा बोराडे ३)महादेव भिमा राठोड यांचेविरुध्द जामखेड पोलीस स्टेशन, जि.अहमदनगर गु.र.नं. २७४/२०२२ भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम सन १९८८ चे कलम १३(१)(क)(ड), १३(२) सह भा.दं.वि.क. ४६८, ४७१, १२०(ब), ३४ प्रमाणे आज दि.२१/०६/२०२२ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आरोपी नं.२ व ३ यांना सदर गुन्हयात अटक करण्यात आली आहे. सदर गुन्हयाचा पुढील पोलीस निरीक्षक गहिणीनाथ गमे, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, अहमदनगर हे करीत आहेत. |

लाचलुचपत प्रतिबंधक विभागातर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागण्या–या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, महाराष्ट्र राज्य यांच्याशी संपर्क करावा.

| | |
|---|---|
| संपर्क पत्ता | :– लाचलुचपत प्रतिबंधक विभाग कार्यालय, जिल्हा मध्यवर्ती प्रशासकिय इमारत, टि.व्ही. सेंटरसमोर, सावेडी, अहमदनगर |
| संकेतस्थळ | :– acbmaharashtra.gov.in |
| ई–मेल ऑनलाईन तक्रार | :– acbwebmail@mahapolice.gov.in |
| ॲप्लीकेशन | :– acbmaharashtra.net |
| टोल फ्री क्रमांक | :– १०६४ |
| दुरध्वनी क्रमांक | :– ०२४१–२४२३६७७ |
| व्हॉटस अप क्रमांक | :– ९९३०९९७७०० |

(हरीष खेडकर)
पोलीस उप अधीक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,
अहमदनगर